# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'.MeloRoad,Fort, Mumbai-400 001 E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360 website: www.msbnpe.org


क्र. मराशुवपशिम/AISHE /३६७८/२०२५ दि. ०३/११/२०२५

परीपत्रक

प्रति,
प्राचार्य / संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित परिचर्या प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य.

विषय: - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता ए.एन.एम , जी.एन.एम व इतर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (aishe) या संकेत स्थळावर वेबडिसीफ मध्ये महाविद्यालयाची माहिती ऑनलाईन रित्या भरणे व अपलोड करणेबाबत.

संदर्भ:- क्र. मराशुवपशिम/AISHE /२४२२/२०२५ दि. २८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाकडे संलग्नित ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर पदविका अभ्यासक्रमाच्या (शासकीय, निमशासकीय व खाजगी, अनुदानीत/विनाअनुदानीत) महाविद्यालयाचे प्राचार्य/ संस्थाप्रमुख, यांना कळविण्यात येते की, सर्व ए.एन. एम., जी.एन. एम. व इतर पदविका अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय यांना AISHE CODE असणे बंधनकारक आहे.

संदर्भ क्र.१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in वर WEB DCF मध्ये माहिती भरण्याची व अपलोड करणेबाबतची वेबलिंक दिनांक १५/०७/२०२५ रोजी पासून सूरू झाल्याबाबतचे परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते.

त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in वर WEB DCF मध्ये माहिती भरणे व अपलोड करणे अनिवार्य आहे. तरी सदरील माहिती न भरल्यास अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) नवी, दिल्ली यांच्याकडून सदर संस्थेची संलग्नता रद्द (Deaffiliate) करण्यात येईल.

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in वर WEB DCF मध्ये अचूक माहिती भरून नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड केल्याचे प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाकडे संलग्नित असलेल्या सर्व ए.एन.एम., जी.एन.एम. व इतर पदविका

अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय यांनी मंडळाला तात्काळ ई-मेलव्दारे (mahadbtmsbnpe2024@gmail.com) पाठविण्यात यावे. तसेच ऑनलाईन ॲफिलेशन २०२५-२६ येथे अपलोड करावेत.

तथापि मंडळाकडे संलग्नित ए.एन. एम, जी.एन. एम व इतर पदविका अभ्यासक्रमाच्या (शासकीय, निमशासकीय व खाजगी, अनुदानीत/विनाअनुदानीत) महाविद्यालयाचे प्राचार्य/ संस्थाप्रमुख, यांना कळविण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in वर माहिती भरण्याची अंतिम दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in web DCF मध्ये माहिती विहित मूदतीत न भरल्यास अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) नवी, दिल्ली यांच्याकडून संलग्नता रद्द (Deaffiliate) करण्यात आल्यास तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाल्यास प्राचार्य/ संस्थाप्रमुख जबाबदार राहतील, यांची नोंद घ्यावी.

प्रबंधक,

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर:

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण तथा आयुष विभाग, मुंबई.
३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई